# देवी अथर्वशीर्ष

# सप्तश्लोकी



संस्कृत + मराठी श्लोकानुवाद

शशिकांत कोंडेजकर

# देवी अथर्वशीर्ष सप्तश्लोकी

## संस्कृत+मराठी श्लोकानुवाद

## शशिकांत कोंडेजकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# - देवी अथर्वशीर्ष सप्तश्लोकी -

**मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. शशिकांत कोंडेजकर**

पत्ता : ए ३०२, मेघदूत, कोथरूड, पुणे.

भ्रमणभाष:-९९६०२४१६१७

संपर्क – व्हॉट्सऍपक्र. 99602 41617

Email : sbkondejkar@yahoo.com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ईसाहित्यप्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २६ सप्टेंबर २०२२ (नवरात्री शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री शशिकांत भगवान कोंडेजकर (काव्यानुवादक)



२००७ साली भाभा अणुसंशोधन केन्द्र मुंबई येथून वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदावरून निवृत्त. अनेक विषयांवर लेखन केले आहे. ई साहित्य वर त्यांनी केलेला भगवद्गीतेचा मराठी श्लोकानुवाद उपलब्ध आहे.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhagavad_gita_sanskrit_marathi.pdf

# प्रास्ताविक

संस्कृत भाषेचा अत्यल्प परिचय जो माध्यमिक शिक्षणाच्या काळातला आहे तेवढाच. पण हल्ली आंतरजालामुळे कितीतरी वाङ्मय आपल्या मातृभषेत वाचायला मिळते.. गीताप्रेसने असंख्य संस्कृत ग्रंथ उपलब्ध केलेले आहेत. त्यातून अर्थ समजून मराठीमध्ये आणण्याचा प्रयत्व चालू आहे. पूर्वी काही अनुवादांना श्री. सुनीळजी सामंत यांनी ईसाहित्यमध्ये सामील करून घेतले आहे. देवाी अथर्वशीर्ष असेच अर्थ समजण्याचा प्रयत्न करून पद्यात आणले आहे. अर्थ समजून मूळ संस्कृत स्तोत्रे म्हणणे हा अधिक आनंददायी अनुभव होईल असे मला वाटते. अनुवादात काही चुकले असेल तर त्यासाठी मला क्षमा करावी आणि सुधारण्याची संधी द्यावी. हा अनुवाद आपल्या सर्वांच्या पसंतीस यावा ही अपेक्षा..

# अर्पण पत्रिका

स दा सर्वदा सुव्रतांसी स्मरावे ।
द या द्यावया तयां विनवावे ।
गु रूंच्या पदासी सदैव नमावे ।
रूपात त्याच्याच विश्र्व पहावे ।।।
सु धर्मे सुकर्मे तयां तोषवावे ।
तयांच्याच चरणी मस्तक नमवावे ।।
सद्गुरू श्री. सुव्रत स्वामी श्री. पृथ्वीराज भालेराव यांचे चरणी अर्पण



# देव्यथर्वशीर्षम्

ॐसर्वे वै देवा देवीमुपतस्थुः
कासि त्वं महादेवीति ॥१॥
साब्रवीत-अहं ब्रह्मस्वरूपिणी।
मत्तः प्रकृपुरुषात्मकं जगत्।
शून्यं चाशून्यं च।

सकल देवगण सामोरे जाहले श्री देवीस।
महादेवी कोण तुम्ही सांगावे आम्हास ॥१॥
देवी वदे मज जाणा, मी ब्रह्मस्वरूपिणी।
प्रकृति पुरुषासह जग, उत्पन्न मजपासुनी ॥
जे आहे आणि नव्हते, अस्तित्व आणि अभाव।
त्या अखिल जगताचा, मजपासून उद्भव ॥२॥

अहमानन्दानानन्दौ ।
अहं विज्ञानाविज्ञाने ।
अहं ब्रह्माब्रह्मणी वेदितव्ये ।
अहं पञ्चभूतान्यपञ्चभूतानि ।
अहमखिलं जगत् ।।३।।
वेदोऽहमवेदोऽहम् ।
विद्याहमविद्याहम् ।
अजाहमनजाहम् ।
अधश्चोर्ध्वंतिर्यक्चाहम् ।।४।।

आनंद अनानंदरूप, अविज्ञान विज्ञान मीच ।
ब्रह्म हे सर्व मीच, अब्रह्म ही जाणा मीच ।।
पंचभूते असे मीच, तसेचि अपंचमहाभूत ।
किबहुना सर्व विश्व, जे दिसते ते मीच जगत ।।३।।

ज्यास नाम जगी वेद, अथवा जे त्यापरे अवेद ।
जगी शोभते जी विद्या, अथवा वेगळी जी अविद्या ।।
प्रकृती अथवा त्याहून भिन्न, जी अजा अणि अनजा ।
खाली वरती आजूबाजूस, सर्व आणि सर्वत्र मी आहे समजा ।।४।।

अहं रुद्रेभिर्वसुभिश्चरामि ।
अहमादित्यैरुत विश्वेदेवैः ।
अहं मित्रावरुणावुभौ विभर्मि ।
अहमिन्द्राग्नी अहमश्विनावुभौ । ॥५॥
अहं सोमं त्वष्टारं पूषणं भगं दधामि ।
अहं विष्णुमुरुक्रमं ब्रह्माणमुत प्रजापतिं दधामि ॥६॥

अकरा रुद्र आठ वसु, बारा आदित्य विश्वेदेव ।
माझाच होतसे संचार, या रूपात सर्व विश्व ॥
अदितीपुत्र जे दोन, विख्यात मित्र आणि वरुण ।
तसेच इन्द्र आणि अग्नि, यांचे करिते मी पोषण ॥ ५॥
सोम आणि आदित्य जे, त्वष्टा पूषा भग ते ।
या सर्वांच्या रूपे, मीच विचरण करते ॥
तीन पावले टाकूनि, त्रैलोक्य व्यापी त्या विष्णुते ।
तसे प्रजापती आणि ब्रह्मा, यांनाही मीच धारते ॥६॥

अहं दधामि द्रविणं हविष्मते सुप्राव्ये यजमानाय सुन्वते ।
अहं राष्ट्री सङ्गमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् ।
अहं सुवे पितरमस्य मूर्धन्मम योनिरप्स्वन्तः समुद्रे ।
य एवं वेद ।
स दैवीं सम्पदमाप्नोति ॥७॥

सोम आणि यज्ञभाग जो, नेतो देवाप्रत त्या जातवेदा।
जाणा ते धन माझे स्वरूप, उपासकांची मी धनदा ॥
मी ब्रह्मरूप ईश्वरी, प्राधान्ये मीच यज्ञदेवता ।
सर्वात्मक-आकाश निर्मिते, आत्मरूप बुध्दीत मी स्थिता॥
तसेच मी जाणा चण्डिका, सागरोत्पन्न आदिमाता ।
जाणती या मम एकत्वा, तयांना प्राप्त दैवी सम्पदा ॥७॥

ते देवा अब्रुवन्- नमो देवै महादेवै शिवावै सततं नमः ।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ॥८॥

देव करती देवीस्तुती, महादेवी नमस्ते तुज ।
कल्याणप्रद कर्मप्रेरणा तू, नमस्कारितो मी तुज ॥
गुणसाम्यात स्थित मङ्गले, नमन करितो तुज ।
शिवा प्रकृति तू भद्रा, नित्यचि नमस्कार तुज ॥८॥

तामग्निवर्णां तपसा ज्वलन्तीं वैरोचनीं कर्मफलेषुजुष्टाम्।
दुर्गां देवीं शरणं प्रपद्यामहेऽसुरान्नाशयित्र्यै ते नमः ॥९॥

अग्नितेज तव वर्ण, तू ज्ञानतेजाचे सुवर्ण ।
दीप्तीमय तव कांती, निजकर्तव्यी तूच प्रेरणा ॥
दुर्गे तव चरणकमली, सर्व काळ आम्ही शरण ।
तूच आम्हा असे ज्ञात, करिसी असुर निर्दाळण ॥९॥



देवीं वाचमजयन्त देवास्तां विश्वरूपाः पशवो वदन्ति ।
सा नो मन्द्रेषमूर्जं दुहानां धेनुर्वागस्मानुप सुष्टुतैतु ॥१०॥

कालरात्रीं ब्रह्मस्तुतां वैष्णवीं स्कदमातरम् ।
सरस्वतीमदितिं दक्षदुहितरं नमामः पावनां शिवाम् ॥११॥

जी ज्ञात आहे वैखरी, प्राणरूप देवे निर्मिली ।
तीच तू वाग्देवता माते, भगवती आनन्दवल्ली ॥
सामर्थ्य आणि अन्नदात्री, कामधेनू आदिमाता ।
संतुष्ट होऊनि या स्तुतीने, आम्हा जवळी ये आता ॥१०॥
वैष्णवी ही तूच माते, वेदांनी गायिली स्तुती ।
स्कन्दाची तू जन्मदात्री, कालरात्री अन् सरस्वती ॥
देवांची जननी अदिती, आणि दक्षकन्या सती ।
सर्व पापे प्रक्षाळिशी, तूच माते भगवती ॥११॥

महालक्ष्मै च विद्महे सर्वशक्त्यै च धीमहि ।
तन्नो देवी प्रचोदयात् ॥१२॥

अदितिर्ह्यजनिष्ट दक्ष या दुहिता तव ।
तां देवा अन्वजायन्त भद्रा अमृतबन्धवः ॥१३॥
कामो योनिः कमला वज्रपाणिर्गुहा हसा मातरिश्वाभ्रमिन्द्रः ।
पुनर्गुहा सकला मायया च पुरूच्यैषा विश्वमातादिविद्योम् ॥१४॥

आम्ही जाणतो ही देवी, विष्णुपत्नी महालक्ष्मी ।
आम्ही करितो हिचे ध्यान, शक्तिरूपीणि लक्ष्मी ।
चण्डिकाशिवा महादेवी, सदा प्रेरित आम्हा करो ।
तिचे सान्निध्य साधण्याला,उद्युक्त ती आम्हा करो॥१२॥
प्रजापती दक्ष राजा, अदिती कन्यका तव ।
अमृतमय कल्याणप्रद, जन्मले तिजपासून देव ॥१३॥
काम योनी कमला इन्द्र, गुहा हेच क ए ई ल ह्रीं ।
ह स वर्ण तसेच वायू, अभ्र इन्द्र हे क ह ल आणि ह्रीं ॥
स क ल वर्ण आणि ह्रीं, ही पंधरा अक्षरी श्रीविद्या ।
सर्वात्मिका जगन्माता, हीच जाणा मूलविद्या ॥१४॥

एषाऽऽत्मशक्तिः । एषा विश्वमोहिनी ।
पाशाङ्कुशधनुर्बाणधरा । एषा श्रीमहाविद्या ।
य एवं वेद स शोकं तरति ॥१५॥

नमस्ते अस्तु भगवति मातरस्मान् पाहि सर्वतः ॥१६॥

परमात्म्याची हीच शक्ति, विश्वमोहिनी हीच ।
हाती शोभते पाश अंकुश, शर चाप धारी हीच ॥
श्रीमहाविद्या हीच जाणा, पंचदशी मन्त्र म्हणती यास ।
याची पूर्ण जाण ज्यास, करी पार शोक सागरास ॥१५॥
जगन्माते भगवतीमाते, तुजला नमस्कार सदा ।
सर्व दुःख संकटात, रक्ष रक्ष अम्हा सर्वदा ॥१६॥

सैषाष्टौ वसवः । सैषैकादश रुद्राः ।
सैषा द्वादशादित्याः । सैषा विश्वेदेवाः सोमपा असोमपाश्च ।
सैषा यातुधाना असुरा रक्षांसि पिशाचा यक्षाः सिध्दाः ।
सैषा सत्त्वरजतमांसि । सैषा ब्रह्मविष्णुरूद्ररूपिणी ।
सैषा प्रजापतीन्द्रमनवः । सैषा ग्रहनक्षत्रज्योतींषि ।
कलाकाष्ठादिकालरूपिणी । तामहं प्रणौमि नित्यम् ॥
पापहारिणीं देवीं भुक्तिमुक्तिप्रदायिनीम् ।
अनन्तां विजयांशुध्दां शरण्यां शिवदां शिवाम् ॥१७॥

अनिलादि आठ वसू हीच, हीच ते अकरा रुद्र ।
आदित्य बारा विश्वेदेव, तिचीच ती रूपे भद्र ॥
यातुधान असुर राक्षस, पिशाच यक्ष सिध्दगण ।
हीच ब्रह्मा विष्णु महेश, सत्त्व रज तम गुण ॥
ही प्रजापती इन्द्र मनु, नभातील ग्रह नक्षत्र तारे ।
कला काष्ठामय काल हीच, नमितो आम्ही हिला सत्वरे॥
भोग मोक्षाची वरदायिनी, सर्व पाप करी निरसन ।
अन्तहीन ही म्हणून अनन्ता, हीच शुध्द अतिपावन ॥
शरण जाऊ सर्वतोपरी, जी विजयाचे अधिष्ठान ।
कल्याण करी जी शिवा, सदासर्वदा तिज नमन ॥१७ ॥

वियदीकारसंयुक्तं वीतिहोत्रसमन्वितम् ।
अर्धेन्दुलसितं देव्या बीजं सर्वार्थसाधकम् ॥१८॥

एवमेकाक्षरं ब्रह्म यतयः शुध्दचेतसः ।
ध्यायन्ति परमानन्दमया ज्ञानाम्बुराशयः ॥१९॥

एकाक्षरी ब्रह्माचे कूट, उलगडू या पहा नीट ।
वियत हेच आकाश जाणा, त्यास "ह" अक्षर कूट ॥
"र" उल्लेखितो अग्नि पहा, अर्धचन्द्र बिंदू ईकार ।
असे हे देवीबीज,साधते पुरुषार्थ चार ॥१८॥
परमानन्दपदी रूढ, जे ज्ञानजलाचे अर्णव ।
अंतःकरणी अति शुध्द, परित्यागी महाभाव ॥
ते सदासर्वदा रत, याचि एकाक्षरी सतत ।
जो देवी बीज प्रणव, जपावा तो हृदयात ॥१९॥

वाङ्माया ब्रह्मसूस्तस्मात् षष्ठं वक्त्रसमन्वितम् ।
सूर्योऽवामश्रोत्रबिन्दुसंयुक्तष्टात्तृतीयकः ।
नारायणेन सम्मिश्रो वायुश्चाधरयुक् ततः ।
विच्चे नवार्णकोऽर्णःस्यान्महदानन्ददायकः ॥२०॥


वाणी आणि माया यांची, कूटचिन्हे "ऐं", "ह्रीं" । तदनंतर ब्रह्मसू काम,
यासचि म्हणती "क्लीं" । व्यंजनातील सहावे "च", त्यापुढे लावूनि काना ।
सूर्याचे अक्षर "म"कार, त्यापुढे उजवा कर्ण "उ"कार ।
त्याच्यावरी देऊन अनुस्वार , "ट" पुढचा तिसरा "ड" कार ।
त्यास जोडोन तेथ "आ"कार, वायूरूप दर्शविती "य" ।
अधर "ऐं" चे असे प्रतीक, ते घेऊनि "विच्चे" उच्चारा ।
या क्रमे नऊ अक्षरा, जाणावे नवार्ण मन्त्रा ।
उपासक नवार्ण सदा जपती, सदैव यास उपासती ।
ते आनन्दसागरी विहरती, तयांना ब्रह्मसायुज्यमुक्ती॥२०॥

हृत्पुण्डरीकमध्यस्थां प्रातःसूर्यसमप्रभाम् ।
पाशाङ्कुशधरां सौम्यां वरदाभयहस्तकाम् ।
त्रिनेत्रां रक्तवसनां भक्तकामदुधां भजे ॥२१॥

भक्तांचे अंतःकरण, मुलायम कमल त्यात ।
त्या हृदयसरोजांतरी, देवीचा वास सतत ॥
उदयाचळी सूर्य येता, प्रभा त्याची मनोरम ।
त्यासमचि दिसे कांती, देवी तव प्रभा मम ॥
पाशअङ्कुश शोभती हाती, मनोहर रूप धारिणी ।
अभय देण्यास भक्तांना, वरदहस्त धारिणी ॥
वसने धारी रक्तवर्ण, त्रिनयना शोभे देवी ।
भक्तांना ती कामधेनू, सदैव मी भजे देवी ॥२१॥

नमामि त्वां महादेवीं महाभयविनाशिनीम् ।
महादुर्गप्रशमनीं महाकारुण्यरूपिणीम् ॥२२॥

आमुच्या महाभयाचा, नाश करी तू लीलया ।
महासंकटे येता पहा, तू समर्थ निवारया ॥
तूच आम्हाला दिसे, तारण्या कारुण्यमूर्ती ।
महादेवी तुझ्या चरणी, नमन करितो भगवती ॥२२॥



यस्याः स्वरूपं ब्रह्मादयो न जानन्ति तस्मादुच्यते अज्ञेया ।
यस्या अन्तो न लभ्यते तस्मादुच्यते अनन्ता ।
यस्या लक्ष्यं नोपलक्ष्यते तस्मादुच्यते अलक्ष्या ।
यस्या जननं नोपलभ्यते तस्मादुच्यते अजा ।
एकैक सर्वत्र वर्तते तस्मादुच्यते एका ।
एकैक विश्वरूपिणी तस्मादुच्यते नैका ।
अत एवोच्यते अज्ञेयानन्तालक्ष्याजैका नैकेति ॥२३॥

ब्रह्मादि देवगणांनाही, नाही पार स्वरूपाचा ।
त्यांना जी असे अज्ञात, तीच असे "अज्ञेया" साचा ।
अंतपार न कळे कोणा, तीच जाणावी "अनन्ता" ।
दृष्टीस अगोचर स्वरूप, "अलक्ष्या" नामे प्रख्याता ।
देवी तिला नाही जनन, म्हणूनि प्रसिध्द नाम "अजा" ।
सर्व ब्रह्माण्ड व्यापिले जिने, तिजवाचून नाही दुजा ।
तीच एकली जाणा हो, तिज ओळखा "एका" ।
सजली तीच विश्वरूपे, सार्थ करी नाम "नैका" ।
नामे अशी सर्व तिजला, आदिमाता चण्डिकेला ।
अज्ञेया अनन्ता अलक्ष्या, अजा एका नैका तिला ॥२३॥

मन्त्राणां मातृका देवी शब्दानां ज्ञानरूपिणी ।
ज्ञानानां चिन्मयातीता शून्यानां शून्यसाक्षिणी ।
यस्याः परतरं नास्ति सैषा दुर्गा प्रकीर्तिता ॥२४॥

तां दुर्गां दुर्गमां देवीं दुराचारविघातिनीम् ।
नमामिभवभीतोऽहं संसारार्णवतारिणीम् ॥२५॥

मातृका ती सर्व मन्त्रात, शब्दात तीच अर्थ ज्ञानी ।
चिन्मयातीत ती ज्ञानात, शून्यातील शून्यसाक्षिणी ।
अन्य कोणी श्रेष्ठ नाही, तीच श्रेष्ठ त्रिभुवनात ।
प्रसिध्द आहे त्रिलोकी, "दुर्गा" नामे विख्यात ॥२४॥
जाणणे जिला दुष्कर, समूळ नाशिते दुराचार ।
भक्तांना भवसागरात, तारिते तीच खरोखर ॥
संसार भवार्णवात, संकटांना मी भयभीत ।
या देवि दुर्गादेवीस, नमस्कारितो सदोदित ॥२५॥

इदमथर्वशीर्षं योऽधीते स पञ्चाथर्वशीर्षजपफलमाप्नोति।
इदमथर्शीर्षमज्ञात्वा योऽर्चां स्थापयति-
शतलक्षं प्रजप्त्वापि सोऽर्चासिध्दिं न विन्दति।
शतमष्ठोत्तरं चास्य पुरश्चर्याविधिःस्मृतः।
दशवारं पठेद् यस्तु सद्यः पापैः प्रमुच्यते।
महादुर्गाणि तरति महादेव्याः प्रसादतः ॥२६॥

अथर्वशीर्ष हे देवीचे, प्रेमभावे पठिता साचे।
गणपती सूर्य नारायण, शिव देवी या सर्वांचे।
पाचही अथर्वशीर्षाचे, पुण्य लाभेल जपाचे।
प्रतिमा स्थापूनि पूजन, शतलक्ष आवर्तन।
परंतु न जाणता अर्थ, निष्फळ होईल अर्चन।
पुरश्चरण विधी याचा, एक शतक अधिक आठ।
दहा वेळा आवर्तन, अथर्वशीर्ष जपता पाठ।
सर्व पापातून मुक्त, तसेच संकट निरसन।
महासंकटातून तरती, होता दुर्गादेवी प्रसन्न ॥२६॥

सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ।
प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति ।
सायं प्रातः प्रयुञ्जानो अपापो भवति ।
निशीथे तुरियसन्ध्यायां जप्त्वा वाक् सिध्दिर्भवति ।
नूतनायां प्रतिमायां जप्त्वा देवतासांनिध्यं भवति ।
प्राणप्रतिष्ठायां जप्त्वा प्राणानां प्रतिष्ठा भवति ।
भौम्याश्विन्यां महादेवीसंनिधौ जप्त्वा महामृत्युं तरति ।
स महामृत्युं तरति । य एवं वेद । इत्युपनिषत् ॥

संध्यासमयी करिता पाठ पापे जळती दिवसाची ।
पहाटवेळी मुखे मुखरता पापे जळती रात्रीची ।
सांज सकाळी ज्याचे पठण त्या अपापित्व लाभते ।
तुरीय मध्यरात्री पठण, ते वाचासिध्दी देते ।
नूतन प्रतिमेसन्मुख पाठ, मिळे चण्डिका सान्निध्य ।
प्राणप्रतिष्ठा समयी जपता, प्राणाची प्रतिष्ठा साध्य ।
भौमवासरे आश्विन नक्षत्रात, महादेवी सन्निध बसूनी ।
जो जपेल हे अथर्वषीर्ष, तरेल तो महामृत्यूतुनी ।
अथर्वशीर्ष हे जाणता, तरेल  महामृत्यूतून ।
उपनिषद हे विख्यात, हेचि ब्रह्मविद्या ज्ञान ॥



शरण मी तुला देवी भगवती ।
शिवा अदिती तुज ठायी वसती ।
कांता तू तव जमदग्नी पती ।
तव सुपुत्र भगवन्त विभूती ।।१।।
भक्त तुझे आम्ही तुज नमितो ।
गहन तव चरित्र आम्ही ऐकतो ।
वाट तव कृपेची आम्ही पाहतो ।
नमन पुनरपि तुजला करितो ।।२।।

कोंदण तुजला तव स्तुतीचे ।
डेरेदार झाड तव कृपादृष्टिचे ।
जवळ करी तू हीच प्रार्थना ।
करकमले जोडुन हीच अर्चना ।
रमणीय तव मुख आतुर दर्शना ।।३।।



# अथ सप्तश्लोकी दुर्गा

## शिव उवाच

देवि त्वं भक्तसुलभे सर्वकार्यविधायिनी ।

कलौ हि कार्यसिध्यर्थमुपायं ब्रूहि यत्नतः ।।

शिवशंकर ते देवी वदले

देवी सत्वर पावसी भक्ता सर्व जगाची कर्ती तू ।

कलीयुगी या पुरण्या इच्छा मार्ग सिध्दिचा दाखव तू ।।

देव्युवाच

श्रुणु देव प्रवक्ष्यामि कलौ सर्वेष्टसाधनम् ।

मया तवैव स्नेहेनाप्यम्बास्तुतिः प्रकाश्यते ॥

ॐ अस्य श्रीदुर्गासप्तश्लोकीस्तोत्रमंत्रस्य नारायण ऋषिः,

अनुष्टुप छंदः, श्रीमहाकालीमहालक्ष्मीमहासरस्वत्यो देवताः,

श्रीदुर्गाप्रीत्यर्थं सप्तश्लोकीदुर्गापाठे विनियोगः ।

ॐ ज्ञानिनामपि चेतांसि देवी भगवती हि सा ।

बलादाकृष्य मोहाय महामाया प्रयच्छति ॥१॥

श्री देवीने उत्तर दिधले

तुमचीच कृपा आणि स्नेहे सांगते इष्टसाधन ।

कलीयुगी साधण्यास सिध्दी अम्बास्तुतीचे महिमान ॥

( ॐ या दुर्गासप्तश्लोकी स्तोत्रमंत्राचे ऋषि नारायण, संस्कृत श्लोक अनुष्टुप छंदात असून याची देवता श्रीमहाकालीमहालक्ष्मीमहासरस्वती आहे. या सप्तश्लोकीचा दुर्गापाठात श्रीदुर्गामातेला प्रसन्न करण्यासाठी विनियोग आहे.)

महामाया भगवती देवी पहा चित्तास मोहवी ।

ज्ञानियांच्याही मनाला तोष आनंद देववी ॥१॥

दुर्गे स्मृता हरसि भीतीमशेषजंतोः
स्वस्थैः स्मृता मतिमतीव शुभां ददासि ।
दारिद्र्यदुःखभयहारिणि का त्वदन्या
सर्वोपकारकरणाय सदार्द्रचित्ता ॥२॥

तुज आठवता दुर्गे सर्वांचे भय घालवी ।
शांत चित्ते तुज स्मरता शुध्द बुध्दी पालवी ॥
भय दुःख आणि दैन्य हारसी तूचि देवी ।
करुणाकरी उपकारी तुजवीण कोण देवी ॥२॥

सर्वमंगलमंगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ॥३॥

मंगल तूं सर्व मंगल करी, कल्याणप्रद तू शिवा ।
त्रिनेत्रे शरणावत्सले गौरी, नारायणी नमन तुवा ॥३॥

शरणागतदीनार्तपरित्राणपरायणे ।

सर्वस्यार्तिहरे देवि नारायणि नमोऽस्तु ते ।।४।।

त्रस्त पीडित दीनांच्या, रक्षणा सदा तत्पर ।

सर्वांचे दुःख हारसी देवी, नारायणी नमन तुवा ।।४।।

सर्वस्वरूपे सर्वेशे सर्वशक्तिसमन्विते।

भयेभ्यस्त्राहि नो देवि दुर्गे देवि नमोऽस्तु ते ॥५॥

सर्वेश्वरी तुझे सर्वत्र रूप, तुज ठायी सर्व शक्ती एकरूप ।

भयमुक्त कर दाव तव रूप, देवी दुर्गे नमन तुवा ॥५॥

रोगानशेषानपहंसि तुष्टा
रुष्टा तु कामान् सकलानभीष्टान् ।
त्वामाश्रितानां न विपन्नराणां
त्वामाश्रिता ह्याश्रयतां प्रयान्ति ॥६॥

सर्व रोगांस हारसी त्यांच्या, होता तूं प्रसन्न
कामना नाशसी त्यांच्या, ज्यांवरी तू अप्रसन्न ।
नाहीच संकटे त्यांना, जी तुवा पूर्ण शरण
जे मनुज तुज शरण, त्यांसी येती सर्व शरण ॥६॥

सर्वबाधाप्रशमनं त्रैलोक्यस्याखिलेश्वरि ।

एवमेव त्वया कार्यस्मद्वैरिविनाशनम् ।।७।।

तिन्ही लोकांची ईश्वरी, बाधा तूं शांत करी

आमुचे शत्रू अरी, नष्ट करी सर्वेश्वरी ।।७।।

।।इति श्रीसप्तश्लोकी दुर्गा संपूर्णा ।।

।। श्रीसप्तश्लोकी दुर्गा संपूर्ण ।।

